IJCRT.ORG ISSN : 2320-2882
INTERNATIONAL JOURNAL OF CREATIVE RESEARCH THOUGHTS (IJCRT)
An International Open Access, Peer-reviewed, Refereed Journal

# महिलांचे आरोग्य व शिक्षण: समस्या व उपाय

**प्रविण भास्कर गायकवाड**
सहशिक्षक, जि.प.कें.प्रा.शाळा बळेगांव,
ता.वैजापूर,जि.औरंगाबाद

आज आपण २१ वे शतकात वावरत आहोत. महिलांनी पुरुषी वर्चस्वाला जबरदस्त धक्का दिला आहे. आपल्या भोवतालच्या बंधनांना झुगारुन दिले आहे. स्त्री ही 'अबला' नसून 'कर्तबगार, तेजस्वी' स्त्री असल्याचे तिने स्वःकर्तृत्वाने दाखवून दिले आहे. देशाच्या राष्ट्रपती, पंतप्रधान पदापासून ते अनेकविविध क्षेत्रात नेत्रदिपक प्रगती केली आहे. आज महिलांचे सबलीकरण, सक्षमीकरण होत आहे. त्याचे श्रेय द्यावे लागते ते स्वातंत्र्यापुर्वी व स्वातंत्र्योउत्तर काळात समाजसुधारकांनी सुरु केलेल्या स्त्रीमुक्ती चळवळीला व त्यांच्या दुरदुष्टीला.[१]

सरकारने मुलींना १२ वी पर्यंतच्या मोफत शिक्षणाची सोय करुनही पालकवर्ग त्यावर अंमलबजावणी करता दिसत नाही. मुलगी शिकली, प्रगती झाली, यासारखी घोषवाक्य आपणास अनेक ठिकाणी पहावयास मिळतात. परंतू, त्याप्रमाणे कृतीकेली जात नाही. काही कुटूंबाचा अपवाद वगळता मुलींच्या शिक्षणास दुय्यम स्थान दिले जाते. मुलगा इंग्रजी माध्यमात चांगल्या खाजगी शाळेत तर मुलीला मुन्सीपल शाळेत शिकवली जाते. समाजातीलच लोकांकडून मुलीच्या शिक्षणावर आक्षेप घेतला जातो. तेव्हा हा जो लैंगिक भेदभाव केला जातो तो कशासाठी? केवळ मुलगी हे परक्यांचे धन आहे म्हणून ! पण व्यक्ती त्यामागे असा विचार करत नाही की एक मुलगी शिकली तर तिच्या कुटूंबाची, समाजाची पर्यायाने देशाची प्रगती होईल. शिक्षण घेऊन आर्थिकदृष्ट्या स्वावलबी होणे ही स्त्री स्वातंत्र्याच्या दृष्टीने काळाची गरज बनली आहे. स्त्रियांना सामाजिक, आर्थिक, राजकीय क्षेत्रात समानसंधी दिली पाहिजे. ग्रामीण भागातील बालविवाह, हुंडापध्दती, स्त्रियांवरील अत्याचार बंद झाले पाहिजे. गरीब, अनाथ स्त्रियांसाठी कामधंद्याची सोय झाली पाहिजे. स्त्रियांकडे भोगवस्तू म्हणून पाहिले जाता कामा नये.

एकूणच, स्त्री सबलीकरण, स्त्री सक्षमीकरण व 'स्त्री' मुक्तीसाठी स्त्री **शिक्षण** आणि तिचे **आरोग्य** हे घटक अत्यंत महत्वाचे ठरतात. किंबहुंना स्त्रीच्या आरोग्यावर तिची उत्पादनक्षमता व सर्वांगिण विकास अवलंबून असतो. त्याही पलिकडे सामाजिक समतोल साधण्यासाठी एक शिक्षण व स्त्री आरोग्य महत्वाचे ठरते. त्या दृष्टीकोनातून मांडणी करत

असताना स्त्री सक्षमीकरण म्हणजे नेमके काय? याचा सार्थ अर्थ लावावा लागेल- स्त्रियांच्या संदर्भात 'स्त्रीमुक्ती' म्हणजेच स्त्री सक्षमीकरण असाही अर्थ घेतल्या जातो. यासाठी शासन व्यवस्थेतर्फे स्वयंसेवी संघटनातर्फे कायदे करण्यासाठी संघर्ष लढे हाती घेतले जातात. माझ्या मते, सक्षमीकरण ही बाब स्त्रीमुक्ती संकल्पनेपेक्षा वेगळी आहे. आजच्या राजकीय आर्थिक व्यवस्था निर्बलांची कार्यक्षेत्रे दिवसेंदिवस सिमीत व संकूचित करीत आहे. प्रत्येकजण विकासाची समाज ऊर्जा आणि इच्छाशक्ती निसर्गतः बाळगत असतात. त्यांना फक्त त्यासाठी अनुकूल समान संधी आणि समान साधने उपलब्ध करुन देणे म्हणजेच, सक्षमीकरण होय.[२] लता बाटलीवाला यांच्या मते,

'स्ज्दीसह् पेदिा र्ग ज्दमें ग्स्र् र्म्हिुग्ह् प ह्रैर्ले ह् ग्मूदह र्द ब्रूर्स्लूम्र् दिमें प्स्म् र्स्हिर्तेग दसर्ह ह् दूर्पे र्ग्न्हुिा ाम्रूदह र्ग्हे ुग्नह म्दह्रूा.[३]

काही जणांनी,सक्षमीकरणाचा व्यापक अर्थाने, विचार केला आहे. त्यांच्या मते, सक्षमीकरण –

'स्ज्दीसह् पेदिा र्ग ज्दमे ंबै प्स्म् प ज्दीर्ते ुग्हॅ्ाा म्दहूदत दने प मिर्स्ल्र्हूमे र्द पिग त्ने. ् ग्हम्त्ले ंदू म्दहूदत दर्ने ादिल्मे (झ्र्म्ब्रेम्ति, प्लि्र्स्ह, ग्हात्तर्मूल्ति, र्ग्हिहर्म्ति) ह् दने ग्दत्दुब (ार्ते, न्त्र्ले र्ह ग्ल्ले)[४] या देशातील समाजवास्तव स्त्री शिक्षण व आरोग्याच्या दृष्टीने विचार करता फार समाधानकारक स्थिती नाही, असे दिसते.त्यात येथील प्रशासकीय व्यवस्था व सत्ताधारी व्यवस्था जबाबदार आहे. राष्ट्रीय महिला आयोग, महिला व बालकल्याण मंत्रालय येथील योजना या उच्चशिक्षित स्त्रिलाही अजून ज्ञात नाहीत. तर, सामान्य, मध्यमवर्गीय व अशिक्षित तथा उपेक्षित महिलांची या संदर्भाने फारच दयनिय स्थिती आहे.

**महिलांचे आरोग्य –**

आज भारतात सर्वच क्षेत्रात आय.ए.एस., वकील, न्यायाधिश, इंजिनिअर्स, डॉक्टर्स, बिझनेस मॅनेजमेंट, अधिकारी, रेल्वे इंजिन ड्रायव्हर्स, पायलट, राष्ट्रपती, प्रधानमंत्री इत्यादी क्षेत्रात आपले क्षेत्र सिध्द करीत आहेत. परंतू, हे सर्व करीत असताना स्त्रीच्या आरोग्यविषयक बाबीकडे व घटनात्मक तरतूदींकडे पाहणे गरजेचे ठरते. स्त्रीला एक स्त्री म्हणून प्राप्त नैसर्गिक, शारिरीक प्रकृती क्षमतांमुळे स्त्री आरोग्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही.

खरंच, या देशातील शासकीय यंत्रणा, राज्यकर्ते व प्रस्थापित, शैक्षणिक व आरोग्य विषयक धोरण स्त्री सक्षमीकरणाच्या दृष्टीने प्रभावीपणे राबविले जाते काय? याचा अभ्यास करताना लक्षात येते की, पुरोगामी म्हणविणाऱ्या महाराष्ट्रात गेल्या ४ वर्षात ३२२४२ महिलांचा हुंड्यासाठी छळ केल्याच्या तक्रारीची नोंद आहे व जवळपास १३६१ महिलांचा हुंडयासाठी बळी गेला आहे. महाराष्ट्रात २०१० ते २०१३ या तीन वर्षात पती व सासरच्या मंडळीकडून केलेल्या छळाच्या २१९८५ तक्रारी नोंदविल्या गेल्या आहेत. तर, देशभरात महिला छळाच्या गेल्या ३ वर्षात २,९९,७०८ तक्रारी नोदविल्या गेल्या आहेत. त्यात सर्वात अधिक तक्रारी म्हणजे ७०८ तक्रारी पश्चिम बंगाल मध्ये नोंदविल्या गेल्याचे दिसून येते. मात्र, अरुणाचल,गोवा, मणिपूर, मेघालय, मिझोरम, नागालॅण्ड, सिक्कीम, अंदमान-निकोबार या प्रदेशात हुंडाबळींची संख्या नगण्य आहे.[५]

अजूनही, ३४[3] टक्के मुलींचे विवाह अल्प वयातच होतात.[६] तसेच, आधुनिक म्हणविणाऱ्या समाजव्यवस्थेमध्ये स्त्रीभ्रुणहत्याचे प्रमाण दिवसेंदिवस अधिक वाढतना दिसत आहे. यामागची स्त्रीद्वेष्टी सामाजिक मानसिकता उघड होताना दिसत आहे.

राज्य सरकारच्या आरोग्य यंत्रणेनेच दिलेल्या माहितीनुसार राज्यात गेल्या १० वर्षात ४ लाख ६४ हजार, सहाशे ८० मुली गर्भातच मारुन टाकण्यात आल्या[७] असल्याचे स्पष्ट होते. नुकत्याच मराठवाड्यातील बिड येथील सुदाम मुंढे यांच्या हॉस्पीटलमधील घडलेले स्त्रीभ्रुण हत्याकांड व नुकतेच घडलेले सांगली जिल्हयातील उघड झालेले स्त्रीभ्रुण हत्येचे मोठे रॅकेट हे उदाहरणही आपल्या डोळयासमोर आहे. एकूणच, हे सर्व प्रश्न स्त्री आरोग्याशी व स्त्रीयांच्या सर्वांगिण शैक्षणिक प्रगतीशी निगडीत आहे.

स्त्री-भ्रूण हत्येचे सामाजिक व नैसर्गिक परिणाम फार जहरी आहेत, गंभीर व भयावह आहेत. मानसिक छळ, हुंडाबळी, बलात्कार, शोषण यामुळे तिचा आवाज आजही क्षिण आहे. त्यातल्या त्यात भ्रूणहत्येने तिचा आवाज गर्भातच मारला गेला असून पुरुषाने मात्र झोपेचे सोंग घेतले आहे.

स्त्रीभ्रूणहत्येचे गुढ आजच्या आधुनिक आर्थिक संपन्न जिवनशैलीत नसून धर्मग्रंथ व धर्मशास्त्रातील स्त्री द्वेष्ट्या तत्वज्ञानात आहे. त्यामुळे स्त्रीभ्रुण हत्याबंदी कायदा व इतर कायदे यांची गरज आहेतच. परंतू, या कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणी तसेच, सामाजिक मानसिकता बदलणे गरजेचे आहे.

स्त्रीयांच्या पुर्नानिर्मितीच्या क्षमता व प्रकृती लक्षात घेऊन राज्यघटनेच्या ४२ व्या कलमात स्त्रियांसाठी प्रसूती सहाय्याची तरतूद केली आहे. तसेच, कुटूंब नियोजनाबाबतीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रीयांचे आरोग्य व कुटूंबाचे योग्य नियोजन स्त्रियांचीच संबंधित आहे, अशी स्पष्ट भूमिका घेतली व राज्यघटनेत त्यांना सरंक्षणविषयक तरतूदी केल्या.[७]

**महिलांचे आरोग्य आणि सनदी नियमन -**

लागोपाठ भरमसाठ मुले जन्माला घालताना अनेक स्त्रिया मृत्युमुखी पडतात. कृत्रिम गर्भपातामुळे स्त्रीचे आरोग्य धोक्या येते. मुले व्यस्त असल्यामुळे शिक्षण व संगापेन व्यवस्थित होत नाही. तसेच, स्त्रिला नको असणारी गर्भधारणा टाळता आली पाहिजे व तशी तिला मुभा असली पाहिजे. तसेच, मुल जन्माला घालणे हे सर्वस्वी स्त्रीच्या इच्छेवर अवलंबून असले पाहिजे. संतती नियमनाची साधने स्त्रीच्या आरोग्याच्या दृष्टीने सुरक्षित असावीत, असे डॉ.बाबासाहेबांचे आग्रही मत होते.[८] म्हणून त्यांनी १० नोव्हेंबर, १९३२ रोजी स्वतंत्र मजुर पक्षातर्फे मुंबई विधी मंडळात 'संतती नियमनाबाबतचा' अशासकीय ठराव मांडला होता.

तसेच, २८ जुलै, १९२८ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी तत्कालीन विधान परिषदेत कारखान्यातील महिला कामगारांना बाळंतपणाची भरपगारी रजा मिळाली पाहिजे, अशी मागणी केली. पुढे सन १९४२ साली कामगार स्त्रियांसाठी 'प्रसुती लाभाचा कायदा' मांडला. तो २३ जुलै, १९४३ रोजी संमत्त करण्यात आला.[९] पुढे १९४५ मध्ये या प्रसुती रजेच्या रक्कमेत वाढ करण्याचे विधेयकही मान्य करण्यात आले. आताचा प्रसुतीपूर्व व प्रसुतीनंतर कामकरी स्त्रियांना जो लाभ मिळत आहे, त्याचे बिजरोपण व पायाभरणी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केली असल्याचे स्पष्ट होते. तसेच, कामगार, कामकरी, स्त्रियांच्या मुलांसाठी सुसज्ज पाळणाघर असावेत, असेही डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते.

आपल्या देशात स्त्री समता, स्त्री आरोग्य व स्त्री सक्षमीकरणाला समोर ठेवून स्वातंत्र्यापुर्वी व स्वातंत्र्यानंतर अनेक कायदे करण्यात आले. स्त्री आरोग्याच्या दृष्टीने हे कायदे फार उपयोगी व महत्त्वाचे आहेत. त्या कायद्यांचा संक्षिप्त उल्लेख करणे येथे गरजेचे वाटते. प्रस्तुत लघुसशोधनिबंधाच्या मर्यादांमुळे प्रत्येक कायद्याचे विषयासंदर्भाने विश्लेषण करणे शक्य नसल्याने येथे फक्त आढावा घेण्यात येत आहे.

१) सन १८०२ - बालहत्या प्रतिबंधक कायदा
२) सन १८९१ - संमत्ती वयाचा कायदा
६) सन १८७२ - विशिष्ट वयाचा कायदा
३) सन १९२८ - वारसा हक्काचा कायदा
४) सन १९२९ - सतीप्रथा बंदी कायदा
५) सन १९५६ - विधवा विवाहचा कायदा
७) सन १९२९ - बाल विवाह प्रतिबंधक कायदा
८) सन १९३७ - हिंदू स्त्रियांच्या मालमत्तेचा कायदा
९) सन १९५६ - द हिंदू ॲडॉपशन ॲण्ड मेंटेनन्स ॲक्ट
१०)०१ एप्रिल,१९७२ - गर्भपाताचा कायदा
११) सन १८७० - स्त्री अर्भक हत्या प्रथेविरुध्द कायदा
१२) सन १९२९ - शारदा कायदा
१३) सन १९४८ - हिंदू कोड बिल
१४) सन २००५ - कौटुंबिक हिंसाचार विरोधी कायदा
१५) सन - निर्भया ॲक्ट
१६) सन - प्रसुती रजेचा कायदा

वरील सर्व कायदे व्यापक अभ्यासाअंती स्त्रि आरोग्याच्या दृष्टीने महत्वाचे व क्रांतीकारक स्वरुपाचे आहे. परंतू, कायदे कितीही कठोर व सक्षम असले तरी प्रश्न प्रभावी अंमलबजावणीचा व सामाजिक मानसिकता बदलण्याचा आहे.

**सारांक्ष व उपाय -**

एकूणच, स्त्री वरील सामाजिक , कौटुंबिक व पतीकडून लादलेली बंधने व जोर-जुलूम, जबरदस्ती व त्यातून उद्‌भवणारे स्त्री आरोग्याचे प्रश्न त्याचबरोबर हुंडाबळी, देहव्यापार, शोषण, कुपोषण, बाळंतपण, अपुरा सकस आहार, प्रसुतीपूर्व व प्रसुतीनंतर अल्प व निकृष्ट जीवनसत्व विरहीत आहार, सकस आहाराअभावातून बाळ व मातेचे कुपोषण व त्यातून उद्भवणारे आजारपण तसेच समाजातील लैंगिक शिक्षण व प्रबोधनाच्या अभावाने, वाढत चाललेले महिला व मुलींवरील अत्याचार व बलात्कार, हत्या, घटस्फोट व यातून उद्‌भवणारे आजार यामुळे स्त्रियांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे वेळोवेळी आरोग्य यंत्रणेने प्रसिध्द केलेल्या अहवालावरुन स्पष्ट होते.

समाजाचे सर्वांगिण कल्याण आणि व्यक्तिगत वर्तन यांचा समन्वय म्हणजे न्याय. समाजातील सर्व स्तरातील व्यक्तीगत विकास साधता यावा, यासाठी तशी सरंचना निर्माण करणे, हे महत्वाचे आहे. कारण, आपला भारतीय समाज विविध जाती धर्मामध्ये, वर्गामध्ये विभागला आहे. येथील कामकरी वर्ग, स्त्रीया यांना अनेक वर्षांपासून शिक्षण, विकास, संधी पासून वंचित ठेवले गेले असल्याने त्या दुर्बल व वंचित घटकांना सामाजिक न्यायापासून विकासाच्या संधी उपलब्ध करुन देणे हे कायद्याचे मुलतत्व आहे. त्यामुळे आपल्या देशातील राष्ट्रीय – राज्य महिला आयोग, तसेच महिला व बालकल्याण मंत्रालय यांनी आपसात समन्वय साधून राजकारण व भ्रष्टाचार विरहीत पारदर्शक कारभार करुन महिला आयोगाच्या सर्व स्त्रि सक्षमीकरणाच्या योजना, सरंक्षण विषयक बाबींची, लाभाची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी या सर्व धोरणांची ग्रमीण व शहरी भागातील सर्व घटकातील व सर्व स्तरातील स्त्रीयांमध्ये या विषयी जागृतीपर उपक्रम राबवून माहिती दिली पाहिजे.

तसेच, आपल्या महिला व बालकल्याण विभागातील अनेक योजना या स्त्रि आरोग्याच्या दृष्टीने अनेक महत्वाच्या योजना आहेत. एक निकोप समाजनिर्मितीसाठी निकोप व निरोगी माता ही पुर्व अट जर मानली तर निरोगी माता व सुदृढ बालक यासाठी या विभागात प्रसुतीपूर्व, गरोदरपणात व प्रसुतीनंतरच्या काळातही माता व बालक यासाठी सकस आहार व इतर अनेक आरोग्यविषयक योजना आहेत. परंतू, या विभागाची व योजनांची माहिती गरीबातील गरीब व उच्चशिक्षित म्हणविणाऱ्या महिलांनाही फारशी नाही. यासाठी सर्व जात, धर्म, वर्गातील महिला व मुलींना अशा योजनांची व महिला व बालकल्याण विभागाच्या विविध योजनांची माहिती मिळण्यासाठी शाळा,महाविद्यालय, झोपडपट्ट्या ते कॉलनीपर्यंत जनजागृतीपर कार्यक्रम घेवून माहिती दिली पाहिजे. स्त्री आरोग्यासाठी हे आवश्यक व महत्वाचे आहे. अशा पध्दतीने एक उच्चशिक्षित व निरोगी माता ही राष्ट्रविकास व राष्ट्रहिताच्या दृष्टीने महत्वाची उपलब्धी ठरते.

**महिलांचे शिक्षण –**

स्त्री शिक्षण व स्त्री स्वातंत्र्याच्या विचार मुल्यांची रुजवण फुले-आंबेडकरी विचारात असून स्त्रियांच्या शिक्षणामागील प्रेरणा ही त्यांच्या मुक्तीची वा उन्नतीची नसते. शिकलेली आई घरादाराला पुढे नेई ही नवी म्हणदेखील स्त्रियांच्या शिक्षणाकडे त्यांच्या उन्नतीचे साधन म्हणून बघितले जात नाही याची साक्ष आहे. शिकलेली आई ही कुटुंबाच्या उन्नतीसाठी हवी असते.

शासकीय धोरणे वा वर्ल्ड बँकेची स्त्री शिक्षणामागील भुमिकाही अशीच आहे. १९६० च्या दशकात तिसऱ्या जगातील गरीब देशांमधील वाढती लोकसंख्या ही जगाच्या विकासासाठी अडथळा आहे, या धोरणेतून गर्भनिरोधासाठी शिक्षण अशी घोषणा दिली गेली. सन १९९२ मध्ये दिल्ली येथे आयोजित केलेल्या अधिक लोकसंख्या असलेल्या राष्ट्रांच्या परिषदेमध्ये सुध्दा स्त्रीशिक्षणाचे उद्दिष्ट लोकसंख्या नियंत्रणासाठी शिक्षण असे पुढे आले. स्त्रीशिक्षण हे साधन आहे, साध्य नव्हे.

एकूणच, आज भारतातील ६०[3] स्त्रिया निरक्षर आहेत व साक्षरपैकी ९०[3] पेक्षा जास्त स्त्रिया या बेरोजगार आहेत. शिक्षित स्त्रियांची प्रचंड श्रम शक्ती ही बेकार व घरबशी आहे. आर्थिकदृष्ट्या त्या उत्पादन क्षेत्रात नाही. त्यामुळे एकंदरच मनुष्यबळ हे निरुपयोगी राहते. असा समाज प्रगतशिल राहत नाही. म्हणून जोपर्यंत कोटयावधी स्त्रीया शिक्षणापासून वंचित आहेत, तोपर्यंत जाती व्यवस्था अंतक भांडवलशाही अंतर व स्त्रीमुक्तीवादी आंदोलने गतिमान होऊ शकत नाही.

जाती व्यवस्था पुरस्कृत परंपरा स्त्रीयांना नकोश्या व्यवसायात ढकळते की ज्यात साक्षरता वा शिक्षणावाचून अडणार नाही, परिणामी, कनिष्ठ जातीतील स्त्रिया अजूनही शेतमजुर, कागद, काच, पत्रा गोळा करणे, सफाई कामगार, लाकडे गोळा करणे, भांडी घासणे, विडया बनविणे व इतरांच्या घरातील कनिष्ठ दर्जाची कामे करण्यास अडकलेले आहेत. निरक्षर स्त्रींवर कुटूंबातर्गत जुलूम, जबरदस्ती याचे प्रमाण मोठे असते. पती व कुटूंबावरील निरीक्षर स्त्रियांचे अवलंबित्व हे साक्षर स्त्रियांच्या अवलंबित्वापेक्षा अधिक असते. परिणामी, तिचा अधिक छळ केला जातो. भारतात महिला आयोगाने केलेल्या पाहणीनुसार ७० टक्के स्त्रियांना नवऱ्याच्या मारहाणीला सामोरे जावे लागते.[१०] परंतू, निरक्षर स्त्रिया अशाही परिस्थितीत हतबल असतात.

मुलींच्या शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोन समाजामध्ये पारंपारिक राहिला आहे. हजारो वर्षाच्या ज्ञानवंचितेतून हा दृष्टीकोन घडला आहे. मुलीला शिकून काय करायचे हा विचार अजूनही प्रभावी आहे.

मुला-मुलींचे एकत्रित शिक्षणाची कल्पना ही स्त्री-पुरुष भेद कमी करण्यास उपयोगाची असली तरी पुरुषी प्रभाव व जातीबंधनांमुळे ग्रामीण शेतकरी समुह ही संकल्पना स्त्रीकारायला तयार नाही. मुलींच्या स्वंतत्र शाळांचा

अभाव व पुरुष शिक्षकांचे प्राबल्य हे मुलींच्या शिक्षणातील मोठ्या अडचणी असल्याचे एका पाहणीत आढळले. त्यामुळे मुलींच्या स्वतंत्र शाळा सुरु करणे व शिक्षकांऐवजी शिक्षिकेची नेमणूक करणे गरजेचे आहे. पुरुषसत्ताक कुटुंबपध्दतीत घरकाम व शेतीकाम या दुहेरी कामात शेतकरी मुली अडकल्या आहेत.

आई-वडील शेतात गेल्यानंतर लहान मुलांना सांभाळण्यासाठी जबाबदारी मुलींवर येते. परिणामी, त्यांची शाळा बंदी होते. ही अडचण दूर करण्यासाठी शेतावर/ खेड्यांमध्ये शेतमजुर शेतकरी स्त्रियांच्या अपत्यांसाठी पाळणाघरे सुरु करणे गरजेचे आहे. केरळमध्ये डाव्या पक्षांच्या स्त्रीमुक्तीवादी भूमिकेतून अशी पाळणाघरे सक्तीची आहेत. त्यामुळे त्या राज्यातील स्त्री साक्षरता ९०$^3$ आहे.[११]

स्त्री शिक्षणाचा प्रसार होण्यापुर्वी स्त्रियांना विशिष्ट प्रकारची कामे करावी लागत. भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही उच्च शिक्षणाचा प्रसार स्त्रियात फार गतीने झालेला दिसत नाही. त्यातही व्यवसाय प्रधान शिक्षणात स्त्रियांचा सहभाग अल्पच राहिला. इंजिनिअरींग, हॉटेल मॅनेजमेंट, वैद्यकीय यासारख्या इत्यादी व्यवसाय प्रधान शिक्षणात प्रत्यक्ष त्या व्यवसायातील पुरुष प्रधानतेमुळे मुलींचा सहभाग मुलांच्या प्रमाणात सिमीतच राहिलेला दिसतो. भारतात एकूण इंजिनिअर्सपैकी स्त्रियांचे प्रमाणे १० टक्केपेक्षा कमी आहे. एका पाहणीत असे आढळून आले आहे की, उच्चशिक्षित बेरोजगारी पुरुषांमध्ये १०टक्के आहे. तर स्त्रियांमध्ये मात्र २७ टक्के आहे. अनेक नोकऱ्या स्त्रियांना केवळ स्त्रि म्हणून नाकारल्या जातात. अर्थव्यवस्थेत रोजगाराच्या बाबतीत स्त्रियांना समान संधी नसेल तर स्त्रि साक्षरता, स्त्रियांसाठी उच्च शिक्षण अशा कितीही मोहिमा हाती घेतल्या तरी त्यातून स्त्रियांचे स्थान उंचावणे शक्य नाही.

**सारांक्ष व उपाय –**

शिक्षणाचे बाजारीकरण व्यापारीकरण धोरण हे स्त्री समतेच्या विरोधात आहे. यामुळे शिक्षण हे विकत घ्यावे सांगत आहे. त्यामुळे ते श्रीमंत वर्गाचीच व त्यातही पुरुषांचीच मक्तेदारी व मिरासदारी बनली आहे. स्त्री हे परक्याचे धन मानले गेल्याने मुलीच्या उच्चशिक्षणावर पैसा खर्च करण्यास आई-वडील तयार नसतात. ज्यांची आर्थिक परिस्थिती बीकट आहे, असे पालक मुली ऐवजी मुलांच्या शिक्षणाच्या खर्चालाचय प्राधान्यक्रम देतात. यामुळे मुलीचे शिक्षण माध्यमिक स्तरावरच थांबविले जाते.

पुरुष पाल्यावर झालेल्या शिक्षणाचा खर्च पालक व विद्यार्थी शिक्षणानंतर हुड्यांच्या रुपाने ती शिक्षणावरील गुंतवणूक वसूल करतात. त्यामुळे हुंडाबळीचे प्रमाण वाढत जात आहे. एकट्या महाराष्ट्रात हुंडाबळीची संख्या दरवर्षी १८००० एवढी नोंदविली जाते.[१२] यातील बहुतांशी स्त्रिया मध्यमवर्गीय उच्चशिक्षित आहेत.

शिक्षणाचा अधिकारच जेथे नाकारला होता तेथे स्त्रियांच्या शिक्षणाची काय प्रगती झाली तिचा आलेख (१०-१० वर्षाचा) स्पष्ट करतो की, स्त्रियांची शिक्षणातील प्रगती दिवसेंदिवस वाढतना दिसत आहे.[१३] विशेषतः परंपरावादी

दृष्टीकोन, ज्यांना केवळ चूल, घर किंवा मुले सांभाळणे यापर्यंतच मर्यादीत ठेवले होते.त्यांच्यापुढे एकूण शैक्षणिक क्षेत्रात स्त्रिया गुणवत्तेच्या बाबतीत पुरुषांना मागे टाकत असल्याचे चित्र आज दिसत आहे.

स्त्रीया सर्वच क्षेत्रात प्रगती करीत असले तरी आजही देशात, राज्यात स्त्रियांवरील बलात्कार, विनयभंग, असीड हल्ला, हुंडा बळी, कौटुंबिक छळाच्या घटना, वेश्यावृत्ती, बाळंतपण, गरोदरपण, कामाचा अतितणाव, पुरुषी वर्चस्वातून निर्माण होणारा मानसिक त्रास या सर्व घटकांमुळे, प्रश्नांमुळे स्त्रियांच्या आरोग्यावर याचा परिणाम होणे, अनिवार्य आहे. या सर्व बाबींवर स्त्रिला भावनिक, मानसिक, नैतिक आधाराबरोबर समुपदेशन, पुर्नवसन व कायदेविषयक संरक्षणाची अत्यंत आवश्यकता असते. तसेच, महिला सक्षमीकरण विषयक धोरण, राज्यघटनेतील तरतूदींची प्रभावी अंमलबजावणीही या अनुषंगाने महत्वाची ठरते.

परंपरागत कायद्यात जखडलेली स्त्री डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या संविधानदत्त समतेच्या आधारावर विकासाची समान संधी मिळाल्याबरोबर शिक्षणातच नव्हे अर्थार्जन, सेवायोजनातील संधीमुळे तसेच, नोकरीमुळे मिळालेल्या स्वावंलबनामुळे सक्षम होऊन सशक्तीकरणाची वाट चालू लागल्याचे दिसून येते.

## संदर्भ -


१) चव्हाण दिलीप, स्त्रीशिक्षणाचा संघर्ष, दुसरी आवृत्ती, २००७ पृष्ठ क्र. ४२

२) मैत्रेय कृष्णराज, १९८८, स्त्रीया आणि विकास, भारतातील अनुभव, सुबदा सारस्वत प्रकाशन, पुणे पृष्ठ क्र.८

(विकासाच्या प्रक्रीयेतील स्त्री प्रश्न – स्त्री अभ्यासकेंद्र, समाजशास्त्र विभाग,पुणे)

३) एर्स्ूर्लैर्ि, स्र्ज्दीसहू र्द दसह ग्हे दर्ल्ूर्ग (इइर्ण्इंि) ूल्ब सूर्ग्त ऊंऊं ोाम्प ग्हेूग्ल र्द दसहे ूलो, ऊर्ल्रर्ज्ले, र्झि - ०८

४) व्दिद र्थ्ह, ास्ज्दीग्हु दसह दि ्ानत्दज्सहू, ऊंऊं ोाम्प ग्हेूग्ल र्द दसहे ूलो, ऊर्ल्रर्ज्ले, र्झि – ५९

५) ऊंत्ब अर्न्हिर्शूप नै र्ज्जे, र्ल्हूं ग्ंदह, ०५/०४/२०१४, र्झि -१२

६) चव्हाण दिलीप, स्त्रीशिक्षणाचा संघर्ष, दुसरी आवृत्ती, २००७ पृष्ठ क्र. ३९

७) ऊंत्ब र्एक्ि नै र्ज्जे, र्ल्हूं ग्ंदह, २५/०६/२०१२, र्झि -१, २

८) डॉ.आंबेडकर गौरव ग्रंथ, संपादक दया पवार, पृ.क्र.५१९

९) लोकराज्य, डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती विशेषांक, महाराष्ट्र शासन , १६ एप्रिल, १९९०, पृ.५०

१०) चव्हाण दिलीप, स्त्रीशिक्षणाचा संघर्ष, दुसरी आवृत्ती, २००७ पृष्ठ क्र.२६

११) प्र्लिह अनत्दज्सहूं ाज्दू – १९९३ र्झि न्द. ८

१२) ऊंत्ब र्एक्ि नै र्ज्जे, र्ल्हूं ग्ंदह, २५/०६/२०१२, र्झि -१, २

१३) प्र्लिह अनत्दज्सहूं ाज्दू – १९९३ र्झि न्द. ६